**Umakant Tipartiwar,**

**B.E. Electronics**



**निर्माण-आत्मरूपाला व्यापक करताना!**

'मी' च्या प्रश्नात अडकलेला मी जेव्हा मलाच प्रश्न विचारतो की "मी कोण आहे?" तेव्हा माझ्यासाठी निर्माण धाऊन येतं आणि उत्तरादाखल स्वभाव व स्वधर्म देऊन जातं.

"अरे ओळखायचं आहे ना स्वतःला, मग जा समाजात, भीड त्या समस्यांना, जाऊन आदळ त्यावर(स्वधर्म)! तेव्हाच कुठं मला माझा इंद्रधनुष्य दिसेल(स्वभाव)" हे निर्माण मला सांगतं.

एका क्षुद्र माकडापासून ईश्वर आहे हे सांगणारा, जगावर अनन्यसाधारण प्रभाव टाकणारा 'मानव' झाला तो समाज या रचनेमुळे. जर तो 'स्व-स्थित' असता तर आजही उडयाच मारत बसला असता. म्हणून स्व ला शोधायचं ना तर "आत्मरूपाला व्यापक करा" हे निर्माण शिकवतं.

जगात घडणाऱ्या गोष्टी समजण्याचं बुद्धी(तर्क) हे एक साधन आहे. ते आपल्याला intellectual(बौद्धिक) पातळीवर जग समजावून सांगतं.

पण त्यासोबतच आणखी एक साधन आहे ते मन(भावना). हे आपल्याला Experiential (अनुभवाच्या) पातळीवर जग समजावून देतं.

पण त्यासाठी आधी भावना ओळखाव्या, समजाव्या लागतील. हे माझ्या बुद्धीला,तर्काला पटवून देण्यासोबतच मनाला अनुभवून देतं ते निर्माण.

स्वतःच्या मूल्यव्यवस्थेचा (value system)

स्वतःच्या निर्णय प्रक्रियेत मोलाचा वाटा असतो.

(निर्णय बहुदा त्यावरच अवलंबून असतात)

ही मूल्यव्यवस्था कळत-नकळत आलेल्या अनुभवांमुळे तयार होते. (Its like programming ourself)

जर या मूल्यव्यवस्थेबद्दलच काही माहिती नसेल तर किती गोंधळ उडेल ना?

ह्या मूल्यव्यवस्थेतील मूल्य, त्यांचा उगम शोधून जी पटत नाही त्यांना काढून व जी महत्वाची आहे त्यांना रुजवण्याची जाणीव मला निर्माण करून देतं. (It's like conscious reprogramming ourself)

कळत-नकळतपणे आलेल्या अनावश्यक बाबींना समजून, त्यांना दूर सारून "आंतरिक आवाजाला" (आंतरिक सत्याला) सक्षम करून मूल्याधारीत व सामाजिक धेय्याधारीत अर्थपूर्ण जीवन समरसून जगण्याची प्रक्रिया म्हणजे "निर्माण"!

मग सामिल होताय ना या प्रवासात?